पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक १६**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १६/७/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. ४८७**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा-कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे जून २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप-१/११०३ दि.१०/७/२०१९ चे पत्र.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ४८८**

मा.विशाल तांबे व मा.बाळाभाऊ धनकवडे यांचे दि.८/७/२०१९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. ३०९ दि. ४/७/२०१९ चा फेरविचार करुन मा.महापालिका आयुक्त यांचे मुळ विषयपत्र मान्य करण्यात यावे.

**विषय क्र. ४८९**

मा.महेश लडकत यांचे दि. १०/७/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.२९ ब मध्ये वृक्ष छाटणी करिता वाहन खरेदी करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | अर्थशीर्षकाचे नाव | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड क्र.सीईर२अे७०४/एसजे२०-५२५, प्रभाग क्र.२९ ब मध्ये पर्वती गाव येथील नव्याने उभारण्यात येत असलेल्या समाज मंदिराची उर्वरित बांधकाम पूर्ण करणे व तदनुषंगिक कामे करणे | १० लाख | - |
| | नविन सुचविलेले काम- | | |
| १. | प्रभाग क्र.२९ ब मध्ये वृक्ष छाटणी करिता वाहन खरेदी करणे | - | १० लाख |

**विषय क्र. ४९०**

मा.आदित्य माळवे यांचे दि. १०/७/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. ७ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.६० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक<br>१) बजेट कोड : CE20C352/SB5-2078 ,<br>प्रभाग क्र.७ क विविध ठिकाणी लाईटचे पोल बसविणे व प्रकाश व्यवस्था करणे | १० लाख | -- |
| २) बजेट कोड : CE20B102/ST2-542<br>प्रभाग क्र.७ क मध्ये विविध ठिकाणी दिशादर्शक व माहितीफलक लावणे | ५ लाख | -- |
| ३) बजेट कोड : CE22A646/SJ22-105<br>प्रभाग क्र.७ क मध्ये विविध ठिकाणी सुरक्षाभिंत बांधणे | १० लाख | -- |
| ४) बजेट कोड : CE22A646/SJ22-107<br>प्रभाग क्र.७ क मध्ये विविध ठिकाणी सुरक्षाभिंत बांधणे | १० लाख | -- |

| | | |
|---|---|---|
| ५) बजेट कोड : CE22A646/SJ22-106<br>प्रभाग क्र.७ क मध्ये विजय हौसिंग सोसायटी जवळील कॅनॉल येथे सुरक्षाभिंत व जाळी लावणे | १० लाख | -- |
| ६) बजेट कोड : CE22A422/SJ2-57<br>प्रभाग क्र.७ क मध्ये पुणे मनपाच्या वीर बाजी प्रभू शाळेमध्ये विविध विकास कामे करणे | १० लाख | -- |
| ७) बजेट कोड : CE20E101/SF1-507<br>प्रभाग क्र. ७ क मध्ये विविध ठिकाणी पावसाळी लाईन टाकणे | ५ लाख | -- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १) प्रभाग क्र. ७ क मध्ये विविध उद्यानामध्ये, मैदानामध्ये व महापालिका सभागृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे | -- | २० लाख |
| २) प्रभाग क्र. ७ क मधील स्वामी विवेकानंद ई लायब्ररीसाठी स्थापत्यविषयक, विद्युतविषयक कामे करणे तसेच संगणक पुरविणे | -- | ३५ लाख |
| ३) प्रभाग क्र. ७ क मधील संत गजानन महाराज उद्यान येथे विविध विकास कामे करणे | -- | ५ लाख |

**विषय क्र. ४९१**

मा.सौ.पुजा कोद्रे यांचे दि. १०/७/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.२२ क मुंढवा भाजी मार्केट येथे विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशीर्षकाचे नाव | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक,<br>१) CE17A227/SJ12-558, प्रभाग क्र.२२ क मुंढवा स्मशानभुमी येथील गॅस दाहिनीचे उर्वरीत काम पूर्ण करणे<br>२) CE22A547/C4-310, प्रभाग क्र.२२ कोद्रे दवाखाना येथे विविध विकास कामे करणे. | १० लाख<br>५ लाख | -<br>- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र.२२ क मुंढवा भाजी मार्केट येथे विविध विकास कामे करणे | - | १५ लाख |

**विषय क्र. ४९२**

मा.सौ.आरती कोंढरे यांचे दि. १०/७/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.१८ ब मध्ये ड्रेनेज विषयक कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशीर्षकाचे नाव | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं.ZE16A104/SP2-2105, पान क्र. ३६ अ.क्र. १०५, प्रभाग क्र. १८ ब मधील गुरूवार पेठ परिसरात व शुक्रवार पेठ परिसरात पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे | १० लाख | - |
| नविन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र.१८ ब मध्ये ड्रेनेज विषयक कामे करणे | - | १० लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ४९३**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१६/६/२०१९ ते दि.३०/६/२०१९ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि-४/१३२ दि.९/७/२०१९ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ४९४**

बालेवाडी स.नं. ४६/४७ जवळ मुळा नदीवर पुल बांधणे उर्वरीत कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जयहिंद रोड बिल्डर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९,३८,६२,१८०/- पेक्षा १४.७६% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. १०,७७,१६,२३७=७६८ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक जी.एस.टी. र.रु. १,२९,२५,९४८=५३ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टींग चार्जेस र.रु.१७,८५,१८४/- अदा करणेस व टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्रकल्प)/१३७ दि.९/७/२०१९ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ४९५**

**अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागामार्फत** (घरपाडी विभागामार्फत) **अनधिकृत बांधकामावर करणेत येणाऱ्या कारवायांची बिले कारवाई धारकांना पाठविताना आकारणी करावयाचे दर** मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद तक्ता ड मध्ये **चौरस फुटांप्रमाणे निश्चित करणे**साठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/१११ दि.२७/६/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ९/७/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४९६**

पुणे महानगरपालिकेकडील अधिकृत फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र/परवाना वारस व्यक्तीस हस्तांतरण करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/११४ दि.२७/६/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ९/७/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. ४९७**

घोरपडी येथे पुणे-सोलापूर रेल्वे लाईनवर उडडाणपूल बांधणे या कामाअंतर्गत रेल्वे क्रॉसिंगच्या स्ट्रक्चरल स्टीलच्या गाडयाच्या कामासाठी मध्य रेल्वे प्रशासन कार्यालय पुणे यांचेमार्फत कळविणेत आलेले एकूण रक्कम रूपये१,८३,७९,३८४/- इतका आवश्यक निधी मध्य रेल्वे प्रशासन कार्यालय पुणे या कार्यालयास अदा करणे व त्याच्या समवेत करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्रकल्प)/१३८ दि.९/७/२०१९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**